# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज : याज्ञसेन पाटणकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** पर्यावरण जागृती व संवर्धन हे वैश्विक कार्य आहे. हे काम मर्यादित स्वरूपात न राहता ते समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण कोयना पर्यावरण जागृती मोहीम राबवत आहे.



पाटण तालुक्यातील सर्व शाळा व ज्युनिअर कॉलेज, सामाजिक संस्था यांनी या मोहिमेत सहभागी होऊन पर्यावरणाचे संवर्धन करूया. पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटणचे संचालक याज्ञसेन पाटणकर यांनी व्यक्त केले. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, सुनील पानस्कर, सतीश गायकवाड उपस्थित होते.

याज्ञसेन पाटणकर म्हणाले, पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. पर्यावरणामध्ये मानवी हस्तक्षेपामुळे मोठी हानी झाली आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारची व काही लोकांची जबाबदारी नाही तर ती प्रत्येक माणसाची, तुमची माझी जबाबदारी आहे. सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे तरच भविष्यात पुढची पिढी सुरक्षित व निरोगी जीवन जगू शकेल. मागील दोन वर्षांपासून पर्यावरण जागृती मोहिमेच्या माध्यमातून सर्व शाळा, कॉलेजमधून पर्यावरण संवर्धन जनजागृती करत आहोत.'